C:\Users\lenovo 1\Documents\88 अ

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय
आवक क्रमांक
8 MAR 2018
शाखा क्रमांक
दप्तर/फाइल क्रमांक

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्तीचा आदेश

जा.क्र.सनिस/वि-१/ओंकारग्रामिण/कलम८८ आदेश/ २०१८
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी देवरुख
विवेक भागवत यांचे घर मधली आळी देवरुख.
दिनांक : ०३/०३/२०१८

वाचले :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व अधिनियम १९६१ चे कलम ८८(१) अन्वये
२. श्री.टी.एन.कावडे विभागिय सहनिबंधक सहकारी संस्था (लेप) मुंबई विभाग नवी मुंबई यांनी दि.१/४/२०१२ ते दि. ३१/३/२०१५ अखेर फेरलेखापरीक्षण करून दि.२०/२/२०१७ रोजी मा.जिल्हा उपनिबंधक यांचेकडे सादर केलेला अहवाल
३. श्री.डी.पी.साळुंके यांचे दि.०३/०३/२०१८ चे सम्मती पत्र.

ज्या अर्थी ओंकार ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्था मर्या देवरुख ता.संगमेश्वर जि.रत्नागिरी ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतुदीप्रमाणे अन्वये नोंदणीकृत असून तिचा नोंदणी क्रमांक आरटीजी/ एसजीआर/आरएसआर/सीआर/६४३ दि. .११.१९९५ असा आहे. त्यापुढे सदर संस्थेचा उल्लेख उक्त संस्था करण्यात आले आहे आणि

ज्या अर्थी सदर संस्थेचा उद्देश संस्थेच्या सभासदामधून ठेवी स्वीकारून गरजू सभासदांना कर्ज स्वरुपात अर्थ सहाय्य करणे संस्थेच्या सभासदांचा आर्थिक विकास करणे हा असून संस्थेचे सर्वकामकाज संस्थेच्या व्यवस्थापक कमीटी कडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत आणि मंजूर उपविधी तरतुदीनुसार करणे आवश्यक आहे. आणि

सदर संस्थेचे मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रत्नागिरी यांचेकडील आदेश जा.क्र.जिउनिर/लेपा/ ओंकारपत/फेरलेखापरीक्षण/ ५७००/सन२०१६, दि.०६.०८.२०१६ अन्वये श्री.टी.एन.कावडे विभागिय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षक) मुंबई विभाग नवी मुंबई यांनी वाचले क्र.२ अन्वये फेरलेखापरीक्षण अहवाल पूर्ण करून तसा खास अहवाल सादर केला आहे. आणि

ज्याअर्थी श्री.टी.एन.कावडे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेप) मुंबई विभाग नवी मुंबई यांनी उक्त संस्थेचे सन दि. ०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१५ अखेरचे फेरलेखापरीक्षण करून त्याचा खास अहवाल दि.२४/०२/२०१७ रोजी या कार्यालयास सादर केला आहे आणि

ज्याअर्थी उक्त संस्थेचे दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१५ अखेरचे फेरलेखापरीक्षणामधील आर्थिक गैरव्यवहार झाल्याने गंभार दोष आढळून आले आहेत आणि तसा खास अहवालात निदर्शनात आणून दिले आहे.

| अ.क्र. | अपहार/गैरव्यवहार झाल्याचे स्वरुप | सन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| १. | ठेव तारण कर्ज | ४८६००३८१.०० | १९४५३८५.०० | ५००००.०० | ४५२६०६६.०० |
| २. | शिल्लक रक्कम | ३०००००.०० | - | - | ३००००००.०० |
| ३. | बचत खाते | - | १००००२.०० | ४८५००००.०० | १५०००००.०० |
| ४. | बँक भरणा | - | | २५०००००.०० | १५०००००.०० |
| | एकुण | ४८६००३८१.०० | २०४५३८५.०० | ५१०००००.०० | २२६२६०६६.०० |

उपरोक्त सर्व आर्थिक व्यवहारातील सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत असून त्याच्या कालावधीपूर्वी म्हणजे २०१२ (दि.३१.०३.२०१२) पुर्वी रु.१,४३,२५,२३४/- चा गैरव्यवहार झाल्याचे खास अहवालात नमुद केले आहे. उपरोक्त व्यवहाराचा अफहार/गैरव्यवहार झाला असून काही व्यवहाराची अनियमीत स्वरुपात असल्याने विगतवार खालीलप्रमाणे

| अ.क्र. | अपहार/गैरव्यवहार झाल्याचे स्वरुप | सन | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
| १. | ठेव तारण कर्ज | ३५२६५००.०० | ७७१६८३८.०० | २०४९३८५२.०० | ३१०२३७५०.०० |
| २. | शिल्लक रक्कम | - | - | - | |
| ३. | बचत खाते | - | - | २५००००००.०० | २५००००० .०० |
| ४. | बँक भरणा | - | - | १६४८४५२.०० | १६२१७५९२.०० |
| | एकुण | ३५२६५००.०० | ७७१६८३८.०० | ४४११००४.०० | ४६२३४३४२.०० |

C:\Users\lenovo 1\Documents\88 अ

ज्याअर्थी परिशिष्ट-१ मध्ये आर्थिक गैरव्यवहार करताना सभासद ठेव तारण ठेवुन खोटी कर्जप्रकरणे करुन शिल्लक रक्कमेचा कर्ज वितरण दाखवुन बचत खाते वर खोटी कर्जप्रकरणे दाखवुन सदर रक्कम स्वताच्या फायदयासाठी वापर करणे ही बाब धक्कादायक असुन सदर बाब ही गैरव्यवहाराची असल्याचे निदर्शनास आणुन दिले आहे. सदर खास अहवालात सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये वेगवेगळया स्वरुपात एकत्रित रक्कम रु.२,४८,७६,७९०/- रक्कमेचा गैरव्यवहार याची सर्वस्वी झाल्याचे स्पष्ट नमुद केले असुन त्यास संस्थेच्या व्यवस्थापिका सौ.वासंती अनिल निकम जबाबदार आहे. आणि सन २०१२ ते २०१४ म्हणजे दि.०१.०४.२०१२ ते दि.३१.०३.२०१४ पर्यंत वैधानिक लेखापरीक्षक करमरकर नाईक अँन्ड असोसिएट्स सनदी लेखापाल फर्म चे भागीदार श्री.आनंद मनोहर पंडीत यांनी पुर्ण केले असुन त्या अहवालात कोणताही दोष नमुद केला नसल्याने अहवाल दि.३०.०८.२०१४ रोजी संस्थेला दिला असल्याचे खास अहवालात नमुद केले आहे. सदर संस्थेच्या सभासदांच्या ठेवींच्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्याने सभासदांचे ठेवींची रक्कमेची सुरक्षितता नसल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे.

त्याअर्थी उक्त पतसंस्थेच्या खास अहवालातील उपरोक्त सर्व आर्थिक व्यवहाराची खात्री करुन, सदर गैरव्यवहारास जबाबदार व्यक्तींची नावे आणि नुकसानीस जबाबदार असलेल्या रकमेसह व्यक्तीशः जबाबदारी निश्चित करणेकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त अधिकार परत्वे मी, संभाजी न. नलावडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, संगमेश्वर(देवरुख) ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी, चौकशी अहवालातील संलग्न परिशिष्ट ३ मध्ये नमुद केलेल्या मुद्देनिहाय स्पष्टीकरण/सारांश केल्याप्रमाणे आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेल्या व्यक्तींची नावे ते नुकसानीस जबाबदार असलेल्या व्यक्तीशः व्यक्तीनिहाय निश्चित करणेकरीता श्री.साळुंके धोंडीराम पांडुरंग, डी -टाईप अपार्टमेंट, डी-४/१:४, पहिला माळा, अ विंग, सेक्टर-१, वाशी नवी मुंबई यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी नुकसानीस जबाबदार व्यक्तींवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८(१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदींस अधिन राहुन नियम ७२(१),७२(२), ७२(३) नुसार व्यक्तीनिहाय आरोप व नुकसानीस जबाबदार असलेल्या रकमेसह निश्चित करावे व अंतिम आदेश दयावेत.

प्राधिकृत अधिकारी यांनी आपला अहवाल या आदेशाच्या तारखेपासुन कायदयातील तरतुदीप्रमाणे मुदतपुर्व सादर करण्यात यावा.

हा आदेश मी, माझ्या सही शिक्क्यानिशी आणि कार्यालयीन मुद्रेसह आज दि.०६/०३/२०१८ रोजी दिला आहे.

ठिकाण: देवरुख
दिनांक: ०६/०३/२०१८

(संभाजी न. नलावडे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,संगमेश्वर
(देवरुख) ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी.

प्रति,
श्री.साळुंके धोंडीराम पांडुरंग, डी -टाईप अपार्टमेंट, डी-४/१:४, पहिला माळा, अ विंग, सेक्टर-१, वाशी नवी मुंबई.
प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१.मा. चेअरमन/ व्यवस्थापक/ सचिव,
ओंकार ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या.देवरुख,ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी
प्रत माहितीसाठी सविनय सादर
१.मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२.मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकणविभाग, नवी मुंबई.
३. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी.